# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

# संवाद

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।***

**Vol.-5** **Issue - 6** **डिसेंबर - २०१२** **December 2012**


## संपादकीय

**प्रिय सभासद मित्रांनो,**

वर्ष काय भर्रकन निघून गेलं, कळलं सुद्धा नाही. वर्ष मावळतीला आणि नूतन वर्षाच्या आगमनाला अशा प्रकारचे उद्‌गार आपण नेहमीच ऐकत असतो.

दिवस उगवतो तसाच मावळतोही. आठवडा येतो, जातो. नवीन महिना सुरू होतो आणि संपतोही. वर्षाचे तसेच आहे ते येते आणि संपते. काहींना ते आनंददायक, समाधानाचे, भरभराटीचे गेले असेल तर काहींना अनंत अडचणींचे, दुःखद प्रसंगाच्या अनुभवामुळे, आनंद झाकोळल्यामुळे जरा उशीराच संपले असे वाटणे साहजिकच आहे. परंतु असेही लोक आहेत की ज्यांचा संसार आज रोजच्या मजुरीवर अवलंबून असतो, आपला उदरनिर्वाह ते कसातरी करत असतात. त्यांच्या क्षिती वर्ष आले काय, गेले काय याचा हिशेब नसतो. परंतु सुखद घटनातील आनंदात रममाण होऊन जाणे वा कष्टदायक दुःखद प्रसंगाच्या जखमा कुरवाळत न बसता जे घडून गेले तो आपल्या जीवनाचाच एक भाग होता, हिस्सा होता अशी मनाची समजूत करून घेऊन काळाशी, परिस्थितीशी जमवून आणि जुळवून घेणे हेच तर आपल्या जीवनाचे खरे सूत्र आहे. पत्त्यात हुकमाचे पान दर वेळेस हातात येत नाही आणि कॅरममध्ये लाल क्वीन आपल्यालाच मिळेल असेही नाही. तरी सुद्धा वास्तवात आनंदाचा शोध घेतला म्हणजे तो जरूर मिळतो आणि त्याला आपल्या मनाच्या उभारीची साथ मात्र बरोबर हवी.

मानवी जीवनात सदा सर्वकाळ व सर्वत्र आनंदच भरून राहिला असता तर जीवन अत्यंत नीरस, एकसुरी व बेचव बनले असते. म्हणूनच की काय निसर्गानेच दुःख, वेदना, अडचणी, आपत्ती, शोक याची निर्मिती केली असावी. आयुष्यात जीवाला घोर लावणाऱ्या घटना वेदना कालांतराने कधी स्मृतीरंजक ठरतात तर काहींची सल तशीच राहते. सरलेले प्रत्येक वर्ष नेहमीच भावनांची सरमिसळ मागे ठेवून जात असते. कधी आनंदी घटनांचे पारडे जड असते तर कधी कष्टदायक भावनांचे. आपल्या देशाचा विचार केला तर सरलेले वर्ष अनेकदृष्ट्या अस्थिरतेचे ठरले यात तिळमात्र शंका नाही.

नवीन वर्ष सुरू होताच आपण काही संकल्प करीत असतो. सर्व संकल्प पूर्ण होतातच असे नाही. काही अर्धवट राहतात. वर्षातून गणपती उत्सवात किंवा दिवाळीला आपण घर आवरायला काढतो. कपाटातील कप्पे आवरताना टाकाऊ वस्तू आढळतात. तर कधी काही चांगल्या वस्तू ज्याची आपल्याला अजिबात आठवण नसते अशा सुद्धा आढळतात. त्या आपण पुन्हा जपून ठेवतो. तसेच नवीन वर्षाच्या दिवशी मनाचे कप्पे आवरायला घेऊ या. चांगल्या स्मृती जपून ठेवत अहंकार, सल, दुःखद आठवणींना बाहेर काढू.

आता नूतन वर्षाच्या उगवत्या सूर्याची किरणे आपल्या जीवनात लखलखीत प्रकाश, नवचैतन्य, नव्या प्रेरणा, नवी उमेद, नव्या आशा निर्माण करणारे सुखाचे, समाधानाचे जावो असा आशावाद मनात बाळगूनच आपण नूतन वर्षाचे स्वागत करू या. आशावाद हा माणसाच्या जन्मापासूनच त्याच्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक बनला आहे आणि या आशेच्या जोरावरच माणूस आपले आयुष्य, जीवन व्यतित करत असतो. या आशावादाचे बोट धरूनच सर्व सभासदांना-सहसभासदांना नूतन वर्षानिमित्त आमच्या शुभेच्छा!


**- प्रभाकर गुपचूप**

**भ्रमणध्वनी - ९८८१५७९४९९**

## E-mail from Deputy Managing Director & C I O Corporate Centre Mumbai

Dear Colleagues,

**IT-enabled initiatives for convenience of the Pensioners**

State Bank of India has always been perceived as a Bank which cares for Senior citizens. In order to reinforce our image, State Bank has launched a series of IT enabled initiatives to provide convenience to the Senior citizens drawing pension through our Bank. By utilizing the CBS/ ATM functionalities, our pensioners are withdrawing money from their pension account by utilizing Anytime, Anywhere Banking. But, for submission of Life Certificate, they were forced to go to their Home Branch. However, we have carried out necessary modifications in our software and **now pensioners can submit their Life Certificate in any of our branches either in person or through their authorized representatives**. As you are aware, Life Certificates have to be submitted by 30th November every year failing which pension for subsequent months is stopped till Life Certificate is submitted. Stoppage of pension not only causes hardship to the pensioners, but also affects CASA Deposits and Govt. Commission of the Bank, We, therefore need to be proactive in obtaining Life Certificate from pensioners and also obtain from them PAN No, Date of Birth of Spouse and Mobile Phone No.

The Bank is sending SMS with details of pension paid to the pensioners who have registered their mobile number. Reminders for submission of Life Certificate and other useful messages are also sent to the pensioners.

Pensioners having Internet Banking facility of the Bank i.e. onlinesbi.com can view/download their Pension Slip through the system.

However, we have been receiving complaints from pensioners through the Reserve Bank of India and the Government that Pension Slip, Due and Drawn Statement, Annexure-IV are not being provided to them. All these statements are made available to the branches, who can take the printout and provide to the pensioners. I would like to enjoin upon our colleagues at the branches to deal with pensioners with care and provide them with the information for better customer satisfaction and compliance of RBI/ GOI instructions in this regard.

Pension software is being redesigned to improve its performance and make it more user-friendly. Most of the deficiencies in the existing pension software have been addressed and the new software being developed will be made available at the beginning of the next financial year.

The Bank has taken the above initiatives through IT to mitigate the hardship of the pensioners and to convey to them that **"WE CARE"**

With Best Wishes,

**S.K.MISHRA**
**DEPUTY MANAGING DIRECTOR & CIO**

Dated: 3rd December, 2012.

*******************************

# State Bank Of India Pensioners' Association Mumbai Circle, (Pune)

Mumbai Zonal Sub Centre

Mumbai Zonal Sub-centre
A/5 Swami Siddharth CHS Ltd.
S.V. Road, Naupada
Thane 400 602
Tel No (022)25446837
Dt 16th December 2012

## N O T I C E

The Managing Committee of the Mumbai Zonal Sub-Centre at its meeting held on the 14th December, 2012 has decided to hold the 26th Annual General Meeting of our Association's Mumbai Zonal Sub-Centre on, Friday, 8th February 2013 at 11.30 a.m. at the following address:-

Shri Shivaji Mandir (Natya Gruha)
Opp. Plaza Theatre, N. C. Kelkar Path, Dadar (W) Mumbai 400 028.

## A G E N D A

1) To condole the deaths of Bank's Pensioners/Family Pensioners/ Associate Members whose names have been reported to us after the 21st March 2012. Members are requested to advise us the names and dates of death of members, if not in the list to be read at the time of AGM.
2) To confirm the minutes of the Annual General Meeting held on 21st March, 2012 (Minutes published in August 2012 issue of Samvad)
3) To honour Senior members who have completed/will complete 75 years of age between the 22nd March 2012 to 8th February 2013 (both days inclusive).
4) Committee's Report for the year 2012 to be read, discussed and adopted (The report will be published in Samvad Issue of January 2013)
5) To discuss recent developments.
6) Speech of the Chief Guest.
7) Speech of the President.
8) Any other business with the permission of the Chair.

By order of the Managing Committee
R.S. Rajiwdekar
Principal Secretary

Encl.: Report

N.B.:- If there is no quorum then the Meeting will be adjourned for half an hour and the adjourned meeting will be held on the same day and at the same venue and the business on the Agenda of the Meeting will be transacted, whether there is quorum or not.

## Note

i) Please bring a copy of "Samvad" issue for December 2012 / January 2013 along with you for security purpose.

ii) Please inform other members, known to you, about this meeting.

iii) The meeting of the Bank's Pensioners arranged by the Bank on the 8th February 2013 will start at 12.30 p.m. at the same venue. (Due to exigencies of services the timing may be changed.)

Important : As per our practice, a memorandum covering all the problems will be submitted to the management well in advance to enable them to study and reply in Bank's Meeting. Pensioners/Family Pensioners are, therefore, requested to furnish their problems to us in writing so as to reach us say before 1st February 2013, so that a consolidated memorandum will be put up to the Bank Management to eliminate direct questions/ discussions with the Management representatives in the Meeting. This is to adhere to the time schedule.

iv) Snacks will be served on the 3rd Floor of the building as usual.

v) All seats in A to C rows are reserved for special invitees. Members are requested to please occupy the seats in other rows. For the sake of convenience all the Members who are completing 75 years and are to be honoured are requested to occupy the seats in A&B rows.

* * * * * * * * *

## Appeal from Nagpur Zonal Sub-Centre

We are very happy to inform all the members that in response to our appeal for raising donations towards Building Fund, we have received an amount of Rs.91,000/- from 22 members up to 10th December 2012. We further advise that the final payment in respect of the flat to be purchased at Nagpur will have to be made by 1st week of March 2012, as such all members who are desirous to remit donation to the building fund a/c are requested to please expedite their remittances either by way of cheques to be sent to us on our residential addresses or by credit to the a/c..For this purpose please note that our Association's a/c no. at V.R.C.E.Nagpur branch has been changed to **32704419549**.

You may credit the desired amount to this a/c..We, however, clarify that the donation amount of Rs.5,000/- per member as expected by us may not be treated as any ceiling, while members are free to contribute donations as per their will and choice. Kindly note that your warm sentiments and blessings are valuable for us as such we welcome all donations of whatever amounts as also in instalments as suggested by some members.

**President and Secretary, Nagpur ZSC**

**नागपूर झोनल सब सेंटरतर्फे आवाहन**

आम्हास कळविण्यास आनंद वाटतो की ऑक्टोबर २०१२ च्या 'संवाद'मध्ये आवाहन केल्यानुसार, आपल्या कार्यालयाच्या जागेसाठी दि. १०-१२-२०१२ पर्यंत २२ सभासदांकडून एकूण देणगी रक्कम रू. ११ हजार जमा झालेली आहे.

आपण घेणार असलेल्या जागेची संपूर्ण रक्कम मार्च २०१३ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत द्यावयाची आहे. तरी सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या देणग्या लवकरात लवकर पाठवाव्यात. देणग्या चेक अथा ड्राफ्टने खालील पदाधिकाऱ्यांकडे पाठवाव्यात अथवा आपल्या असोसिएशनच्या व्ही. आर. सी. ई. नागपूर शाखेत असलेल्या खाते क्र. ३२७०४४११५४१ मध्ये जमा कराव्यात. ह्या बाबत आम्ही स्पष्ट करू इच्छितो की देणगीच्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. देणगी कितीही रकमेची तसेच देणगीची रक्कम आपण काही हप्त्यामध्ये पण पाठवू शकाल. कोणत्याही रकमेची देणगी आम्ही आनंदाने स्वीकारू.

आपल्या सर्वांच्या सदिच्छा तसेच आशीर्वाद व सद्भावना आम्हास लाख मोलाच्या आहेत. आपण सढळ हाताने देणगी पाठवालच अशी खात्री आहे. कृपया देणगीची रक्कम लवकरात लवकर पाठवणे ही कळकळीची विनंती.

| **व्ही. डी.देशपांड** | **एस्. एम्. अग्रेकर** | **ए.पी.वालोकर** |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
| प्लॉट नं.२०१ | १७/ए, | ३६ करीम लेआऊट |
| श्रीकृपा | महावीर नगर | स्टेट बँक कॉलनी |
| सुरेंद्रनगर | एस.डी.इस्पितळा | दक्षिण अंबाझरी मार्ग, |
| खामला रोडजवळ | जवळ, पो.ऑ., | गोपालनगर, |
| नागपूर | हनुमान नगर, नागपूर | नागपूर |
| ४४००१५ | ४४०००९ | ४४००२२ |
| मो.९४२२१०८५३२ | मो.९४२२१०५०३० | मो. ९८९०६१६२१४ |

# *STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION*
## *(MUMBAI CIRCLE)*
## *NAGPUR ZONAL SUB-CENTRE*
## *(VIDARBHA REGION)*

### *QUARTERLY MEETING OF NAGPUR ZONAL SUB CENTRE.*

"Quarterly Meeting of the Nagpur Zonal Sub-Centre of the Association will be held on Saturday, 12th January, 2013 to discuss following issues:-

i) Report on Zonal Sub-Centre Activities.

ii) Latest Developments.

iii) Any other matter with the permission of chair.

***Venue*** : IIIrd Floor, Canteen Hall, Zonal Office, State Bank of India, Nagpur.

**Date & Time** : Saturday the 12th January 2013 at 4.00 P.M.

********

## युनिट वार्ता

### अमरावती युनिट -

दि. २९.११.२०१२ रोजी अमरावती मुख्य शाखेत निमंत्रित सदस्यांच्या उपस्थितीत व अमरावती शाखेचे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. रघुनाथ लोटे साहेब यांचे अध्यक्षतेखाली अमरावती युनिटची विशेष सभा संपन्न झाली. सर्वप्रथम सचिव, श्री. मुकुंद जोशी यांनी अध्यक्ष श्री. लोटे साहेब व उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे प्रयोजन विषद केले. त्यानंतर युनिटचे अध्यक्ष श्री. निमदेव यांनी युनिटसाठी अमरावती युनिटच्या सदस्यांच्या फोन क्रमांकाचे फोन-बुकचे महत्व सांगून श्री. लोटे साहेब यांना फोन-बुकचे औपचारिक विमोचन करण्याची विनंती केली. श्री. लोटे साहेब यांनी फोन-बुकचे अनावरण केले. सभेला युनिटचे सर्वश्री बाळासाहेब वैद्य, ब्रिजलाल अडवाणी, पी.एन्. देशपांडे व इतर वीस सदस्य आवर्जुन उपस्थित होते.

ह्यानंतर अध्यक्ष श्री. लोटे तसेच श्री. वैद्य यांनी युनिटचे फोन बुक प्रसिद्ध करून एक अभिनव उपक्रम यशस्वी केल्याबद्दल कार्यकारिणीला धन्यवाद दिले. श्री. जोशी यांच्या आभार प्रदर्शनानंतर उपस्थितांना चहापान देऊन सभा संपन्न झाली.

सेक्रेटरी, अमरावती

*************************

### Attention Members of Amravati Unit

We are glad to inform all our Amravati Unit members that our PHONE BOOK is ready for distribution. You are requested to collect your copy at earliest from Shri. M.W. Joshi, 11, SBI Vinod Co-op. Housing Society, Near Police Parade Ground, Camp, Amravati - 444 602.

- M.W.Joshi, Secretary
(M) 08793507783

*************************************

### अहमदनगर युनिट

अहमदनगर युनिटच्या वतीने दिनांक ३०.१०.१२ रोजी रविकिरण सोसायटीमधील श्री. जयराम थदाणी यांच्या बंगल्यावर कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी झाली. या कार्यक्रमास ७८ सदस्य उपस्थित होते. विशेष निमंत्रित म्हणून मोतीलाल पुरोहित- एजीएम, अहमदनगर व सावेडी शाखेचे शाखाधिकारीही उपस्थित होते.

वेदोक्त मंत्रपठणाने गणेशपूजन झाले. अनेक सदस्यांनी कथा, चारोळी, विनोद, चुटकुले व कविता सादर केल्या. श्री. शिवप्रसाद जोशी, सचिव ह्यांनी नोव्हेंबर २०१२ मध्ये आपल्या शाखेत लाईफ सर्टिफिकेट देण्याची विनंती केली.

श्री. मोतीलाल पुरोहित ह्यांनी सर्व सदस्यांना आर. बी. ओ. कार्यालयाकडून सदैव सहकार्य मिळेल ह्याची ग्वाही दिली. दुग्धपानानंतर सामुदायिक पसायदानानंतर कार्यक्रम संपला. अनेक सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**- शिवप्रसाद जोशी,** सचिव

**************************

## SBI Pensioners' Association
## (Mumbai Circle), Pune
## NAGPUR ZONAL SUB-CENTRE

As appealed by Nagpur ZSC through 'Samvad' of November 2012 for Donations for its Building Fund, there is a good start and the members have given Donations as under. Such Donation list will be published in Samvad every month.

- Secretary, Nagpur ZSC

********************************

| | Name | City | Amount |
|---|---|---|---|
| 1) | V.D.Deshpande | Nagpur | 5001 |
| 2) | P.B.Badge | Nagpur | 5000 |
| 3) | V.G.Nimje | Nagpur | 5000 |
| 4) | N.S.Diore | Nagpur | 5000 |
| 5) | V.V.Dande | Nagpur | 5000 |
| 6) | P.G.Pendke | Nagpur | 3000 |
| 7) | G.N.Mohadarkar | Nagpur | 2501 |
| 8) | Y.Z.Bhogaonkar | Amravati | 2500 |
| 9) | A.V.Mudholkar | Akola | 1111 |
| 10) | M.Y.Kannao | Wardha | 1100 |
| 11) | M.K.Ambare | Buldana | 1001 |
| | | Total Rs. | 36214 |

***********************************

**MARY CHRISTMAS & HAPPY NEW YEAR**

## Religion and Spirituality

Basics of religion are evolved from spiritual experiences of prophets and saints which are outwardly expressed in different words but essentially represent the same truth of the Spirit. Wrong interpretations by scholars and priests of this truth results into various faiths and religions.

In the book "The Holy Science", Swami Shri Yukteshwar Giri (1855-1936) illustrated by explaining passages in the Hindu and Christian scriptures the parallel of their contents. In fact, all religions have similar basic concepts though expressed in different words. Still religious traditions and rituals connected with various faiths are different at different places and time and of different communities.

**Religious Rituals :**

From my childhood till now, I have seen changes in religious traditions and rituals. These are also different in different states. Some would not skip morning pooja for half an hour or an hour. Some items permissible for fasting in particular communities are not permissible for others. I find some persons of one community going to temple in the morning bear foot, wearing silk dhoti and many times accompanied by a teenage son. In fact, in the absence of manual work due to machines at home and reduced need of walking to travel, morning walk, some other aerobic exercises, meditation for peace of mind etc. are essential. With changing time and facilities, there is need of changing day to day practices.

About a century back, elderly ladies in India would go on pilgrimage with a desire to die at a holy place. Priests used to exploit them and some times kill them. This can not be a religious practice. Sixteen years back while retiring from the SBI, taking advantage of the last leave fare facility, I went to Varanasi to visit the temple on my birthday.

An elderly lady from a well to do family was walking in the lane going towards the temple A bull was running in the lane and the State Bank Officer in charge of the sub-office near the temple moved her aside to ensure that she was not hurt. The lady was furious because she was not allowed to die at a holy place. These are some of the changing practices.

One of the rituals of the Hindus is to worship instruments and machines on Dasara day Software entrepreneurs in Bangalore garland their instruments mostly daily .I have seen a Muslim company offering flowers to machines on Dasara day.

**HINDUISM :**

Hinduism is the name given to the faith of the people living across the river Indus (Sindhu).Prior to that name, it was called as Sanaatan Dharma. Still the name exists although all the common Hindus may not know it. Do's and Do not's to be followed are described in Sanaatan Dharma. Rig Veda and Upanishadhs were the scriptures of which authors are not known. Rig Veda's origin goes back to thousands of years prior to Lord Krishna (3000 yrs BC). Lord Krishna counseled Arjuna at Kurukshetra when the latter was shivering and had dry mouth seeing the elderly relatives, acharyas and Kauravas who had gathered for the war.Those counsels gave Arjuna the spiritual experience and he was ready to follow his dharma as kshatriya of fighting for righteous cause. The book on the counsels is "Srimad Bhagavadgita" and is the holy book of Hindus. Its contents are by and large universally accepted as wise counsels though interpreted differently by different people. In Siberia due to misinterpretation ,the question of banning the Gita was considered in Dec 2011.

Jainism , Buddhism and Sikhism have prophets who were born as Hindus. Hindus consider Lord Buddha as an Avtar ie incarnation of God. The word is derived from Sanskrit . Av means down and tarati means travels. God comes down for upliftment of people and hence known as Avtar. Lord

Buddha prescribed meditation technique called Vipasshyana which when followed deeply and regularly gives spiritual experience. Spiritual techniques of Buddhism have special appeal to modern people of many faiths. The connection of mind, body and soul that Buddhism advocated can be mapped scientifically by brain imaging technique.

**Christianity :**

The followers of prophet Jesus Christ who was born as Jew are Christians. It is the largest religion in the world. The life and teachings of Jesus Christ are a way to peace and happiness .As stated above, the similarity in the Hindu and the Christian scriptures have been established by Swami Yukteshwar Giri. The Christian missionaries have done very good work of charities all over the world. But due different interpretation of scriptures considerable conflicts were also created .About seven hundred years back Christians were burning heretics and waging holy global wars. By about mid 1800s in the US there were conflicts of Protestants against Catholics .Across the centuries within protestants other religious denominations like Calvinist, Lutheran and Anglican emerged.

**Islam :**

Prophet Mohammed was a political and military leader. His religious prescriptions resulted into social and cultural innovations. He had to engage himself in war which he led but won it by eschewing violence for two years and practicing nonviolence .He finally taught that forgiveness is better advocated and that if enemy wants peace one should lay down arms. In fact, he finally practiced nonviolence.

But different interpretations of scriptures result into terrorists attacks and militancy in which many Muslims have been killed than nonmuslims. Shias and Sunnis have differences among themselves. Khojas and Bohras are more denominations amongst Muslims. Sufi culture has mysticism in it.

Muslim thinker Khaled Abou El Fadl has stated in his book "Wrestling Islam from Extremists" that key to the future of Islam lies in recovering its "core moral value of beauty"

**Zoroastrianism :**

Zoroastrianism is a religion and philosophy based on teachings of prophet Zoroaster(also known as Zarathrusta).They are Aryans .It is one of the oldest of the revealed world religions. Prior to Islamisation of Iran in the seventh century, this was the primary religion of Iran. Later on it was divided into two branches of Iranians and Indians. It is a small religious community mostly in Mumbai and Gujarat.; arrived in India from Persia and hence known as Parses. The religion was established in 6th or 7th century BC. Parses exiled from Iran in the 7th century and came to Gujarat. They are pioneers in establishing modern Indian industry. They established institutions of all kinds and did valuable charities. They adopted Gujarati language, some Indian customs but retained their original faith and became one with Indians like sugar mixes in milk. But in an anxiety to retain purity they are not allowing any changes in their ways. In the process they marry some times amongst close relatives resulting into inbreeding which causes to produce some unhealthy children. The community is reducing its population resulting in reducing the community size.

**Spirituality :**

One gets his/her religion by birth. It is essential to adopt. some code of conduct. Even an atheist derives some sort of method of behavior from family tradition. Thus some proper thoughts and good practices are followed in many families. Traditional hymns teach us to think of welfare of mankind and gratitude to God. Initiation into spirituality can happen in the course of following these traditions, if we get proper direction and motivation .Fifty eight years back, I read Swami Vivekananda's book "Karma Yoga" borrowed from the library at my native place. .Adi Shankaracharya said that karma is meant for

purification of heart. I learnt from the book about a housewife doing household cores with keen interest, devotion and nonattachment gaining powers like yogis. Also read about a butcher who is the author of Vyadha Gita. Due to faithful practice of butcher's work as a means of livelihood taught to him by his father, though he himself was a vegetarian was yogi. Yoga means union with God. Karma Yoga in which work is practiced as worship without expecting fruits of action enables the practitioner to have union with God. Spirituality banishes ego and uplifts energy from within oneself.

The family tradition and exposure to books like this prompted me to follow yoga since last thirty years. Trained mind by yoga can attain control on five senses and thus sixth sense is developed. This enables one to achieve connection between body, mind and soul (ie God within) which is spirituality. I am yet to become spiritual in its entirety but have found the path. Secular mark of religion has developed due to spirituality of human beings. Spirituality requires unconditional love of God, meditation , mental wellness and living in now ie present moment .It is a great stress buster.

Except Hinduism, the most major faiths came into existence during a period of turmoil. Religions were established by human beings based on spiritual experiences of prophets and saints and not by God. In the process, due to different interpretations of holy books and scriptures, religions have also created volatile aspects of human life. There is no concept of conversion in the Hinduism .But, shuddhikaran was introduced for those converted persons who wanted to come back to their original faith.

**Conclusion :**

Religion is quite important to have basic code of conduct and way of life without which the existence will be without any direction for life. But, it is also necessary to be free from prejudices and wrong interpretation of religions. Empathy and compassion are important to have loving and happy life. Therefore, developing spirituality is quite important. Religion and spirituality when practiced together will result into happy and rewarding life.

I was inspired to write this article after reading the books," Speaking of Faith" by Krista Tippett and "Twelve Steps to a Compassionate Life" by Karen Armstrong.

***- S.V.Naik***
Andheri East, Mumbai 400069
Cell # 09821127616

*********************************************************************************************

## लाईफ सर्टिफिकेट

ज्या सभासदांनी अजून लाईफ सर्टिफिकेट बँकेत जाऊन दिलेले नाही अशांनी लाईफ सर्टिफिकेट त्वरित द्यावे. अन्यथा बँक अशा पेन्शनर्सचे पेन्शन जमा करणे थांबवेल याची नोंद घ्यावी.

– सेक्रेटरी

## Life Certificate

**Those who have not yet furnished Life Certificate to the Bank, they are requested to furnish the same without any further delay. Otherwise Bank will stop payment of pension which please note.**

**- Secretary**

# श्रद्धांजली

**कै. दामोदर रामचंद्र तिरोडकर**

**जन्म : २५-१-१९३१, देवाज्ञा : २४-११-२०१२**

आपल्या असोसिएशनचे एक अत्यंत उत्साही कार्यकर्ते व २००३-२००४ सालचे ''कै. ल. ना. पाबळकर स्मृति'' सुवर्ण पदकाचे मानकरी श्री. दा. रा. तिरोडकर यांचे दि. २४-११-२०१२ रोजी गोरेगाव (मुंबई) येथे वयाच्या ८२ व्या वर्षी दु:खद निधन झाले, हे कळविण्यास आम्हास तीव्र दु:ख होत आहे. स्टेट बँकेत ३४ वर्षे सेवा केल्यानंतर ते ३१.१.१९९१ रोजी सेंट्रल ऑफिस (वरळी) मुंबई येथून सेवानिवृत्त झाले.

त्याच्याबरोबर काम केलेल्यांना, त्यांच्या हसतमुख, सेवाभावी चेहऱ्याची तात्काळ आठवण येईल. सेवानिवृत्तीनंतर स्वस्थ न बसता जमेल ते काम करण्याच्या उद्देशाने ते १९९३ साली असोसिएशनच्या मुंबईच्या कमिटीत दाखल झाले. गेली सुमारे १९ वर्षे आपल्या संघटनेच्या सभासद नोंदणीचे काम त्यांनी केले. मधल्या काळात १९९९/२००० मध्ये ते एक वर्ष 'मुंबई झोनल सब सेंटर'चे सेक्रेटरी होते. मुंबई व उपनगरातील बऱ्याच सेवानिवृत्तांचा व त्यांचा चांगला परिचय होता. त्याचा योग्य तो फायदा असोसिएशनची सभासद नोंदणी करण्यात त्यांनी केला. त्यांनी सुमारे २,१०० पेन्शर्सना आपले सभासद केले. तसेच मेंबरशिप वर्गणी व सर्व प्रकारच्या देणग्या असे एकूण सुमारे रु. २७ लाख असोसिएशनला मिळवून दिले.

आपण जेव्हा 'सुप्रिम कोर्टात' केस दाखल करण्याचे ठरविले, त्यावेळी आपल्या संघटनेला 'लीगल फंडासाठी' पैसे जमविणे आवश्यक होते. तेव्हा देणग्या देण्याचे आवाहनही 'संवाद' मधून सर्वांना केले होते. श्री. तिरोडकरांनी त्यावेळी केवळ तीन महिन्यात रू. तीन लाखाच्या देणग्या जमा केल्या. या कामानिमत्त दि. १२-७-२०१० ला पुण्यात झालेल्या आपल्या संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांचा संघटनेतर्फे विशेष सत्कार केला. इतर कामाबरोबरच त्यांनी काही फॅमिली पेन्शनर्सना त्यांच्या हक्काचे पैसे मिळवून दिले.

संघटनेच्या विस्ताराला तसेच संघटनेस आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नि:स्वार्थी व मेहनती कार्यकर्ते लागत असतात. अशा अनेक कार्यकर्त्यांमुळे संघटना नावारुपाला येते. अशा कार्यकर्त्यात कै. तिरोडकरांचा समावेश होतो म्हणून या त्यांच्या कार्याचा गौरव संघटनेने दि. १७-७-२००४ रोजी पुण्यात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'कै. ल. ना. पाबळकर स्मृति सुवर्ण पदक' व मानपत्र देऊन केला.

आपल्या फेडरेशनच्या २००५ साली झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी श्री. तिरोडकरांच्या कामाचा उल्लेख केला तेव्हा श्री. सुरेश रिंदानी, (अध्यक्ष, अहमदाबाद सर्कल असोसिएशन) म्हणाले की आमच्या असोसिएशनमध्ये असा एक 'तिरोडकर' असावयाला हवा होता.

श्री. तिरोडकरांचे कार्य सदैव आपल्या आठवणीत राहील. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो, तसेच त्यांच्या सर्व कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर शक्ती देवो हीच ईश्वरचरणी आम्हा सर्वांची प्रार्थना.

**- बा. ग. दांडेकर**

## अभिनंदनीय

पुणे येथील आपले एक सभासद श्री. एस्. डी.कुलकर्णी यांचा मुलगा चि. प्रणव याने मार्च २०१२ मध्ये झालेल्या महाराष्ट्र बोर्डाच्या १० वी च्या परीक्षेत ९४% गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले. त्याच्या या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**


मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली

**राजगुरु टुर्स**

जिव्हाळा जपणारी माणसं...

| | |
|---|---|
| सिमला-चंदीगड-मनाली AC | 18975/- |
| नैनीताल-कॉर्बेट-मसुरी AC | 19975/- |
| केरळ-कन्याकुमारी AC | 19975/- |
| काश्मिर-वैष्णोदेवी | 17475/- |
| दार्जिलिंग-गंगटोक-सिक्कीम | 20975/- |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | 17975/- |

• भुतान • दुबई • नेपाळ

• थायलंड • मलेशिया • सिंगापूर

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना विशेष सवलत


022-24318082 / 24381026

राजन पाडलोसकर 9322231216

E-mail : rajgurutours@yahoo.in

www.rajgurutours.com

# मैत्र जीवाचा



एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात 'महादेव'चा माधवराव व 'गणेश'चा गणपतराव होई तर आमच्या आधीच्या पिढीत नरहरचा नरुभाऊ आणि 'श्रीधर'चा शिरुभाऊ होत असे. हा वारसा घेऊन मित्रमंडळीत आयुष्यभर 'शिरुभाऊ' हे अभिधान अभिमानाने मिरवणारे बँकेतील अनेक मंडळींचे मित्र आणि माझे जिवाभावाचे स्नेही **श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे उर्फ शिरुभाऊ** हे दि. ८ नोव्हेंबर २०१२ रोजी निवर्तले.

पंचवीस वर्षापूर्वी १९८७ च्या ऑक्टोबर महिन्यात बँकेतील मित्रवर्य जयंत पुसाळकर याने एका शुभ शकुनावर शिरुभाऊंशी माझी ओळख करून दिली. शिरुभाऊ व मी दोघेही त्यावेळी 'पुणे मुख्य शाखे'त असूनही आमची ओळख नव्हती कारण ती शाखा त्यावेळी फार मोठी होती. साहित्याचा अंगारा भाळी लावून मिरवणारा मी, पण साहित्याची कवचकुंडलं धारण केलेल्या शिरुभाऊंचं बोलणं ऐकून भारावून गेलो, इतका प्रभावित झालो की त्यांच्या 'व्यक्तित्वा'त विरघळून गेलो तो कायमचा!

त्यांचा नि माझा स्नेह दिवसेंदिवस घट्ट होत गेला. याचे मुख्य कारण आमच्या आवडीनिवडीतील बरचसं साम्य. संस्कृत प्रेम मराठीबद्दलचा जिव्हाळा, लिहिण्या-वाचनाची प्रचंड आवड, भटकणे, गप्पा मारणे, साहित्यिकांच्या भेटी घेणे, त्यांची भाषणे ऐकणे इत्यादी. आमच्या दोघांचाही ग्रंथसंग्रह समृद्ध होता (भले तो अस्ताव्यस्त असेल!) मुख्य म्हणजे आम्ही दोघे साहित्यभक्त होतो, साहित्यपंढरीचे वारकरी होतो. त्यामुळे तर आमचं गोत्र जमलं.

शिरुभाऊ मूळचे सांगलीचे. तिथल्या प्रसिद्ध सिटी हायस्कूलमधून मॅट्रिकला त्यांना संस्कृतचे (सांगली जिल्ह्यासाठी ठेवलेले) 'अकबरनवीस पारितोषिक' मिळाले होते. संस्कृतवरील प्रेमामुळे त्यांच्या लेखवात संस्कृत सुभाषित नाही असं सहसा होत नसे. संस्कृतमुळे त्यांच्या मराठीला प्रगल्भ आणि विद्वत्ताप्रचुर असा डौल प्राप्त झाला होता. किंबहुना तीच त्यांची शैली होती.

शिरुभाऊंना पत्र लिहायची दांडगी हौस होती. एखाद्या शूरवीरानं कायम तलवार उपसून तयार राहावं अगदी तसे ते पेन घेऊन तयार असत. पुस्तकातली वा वर्तमानपत्रातली एखादी गोष्ट खटकली वा प्रचंड आवडली की ते पेन सरसावून पटकन पत्र लिहून मोकळे होत. त्यामुळे त्यांच्या पत्रात कधी शब्दांच्या ठिणग्या झालेल्या दिसत. पण बहुतेक वेळा कौतुकाच्या शब्दफुलांची प्रेमळ पखरण असे. साहित्यिक, पत्रकार, राजकारणी, समाजधुरिण अशा सर्व मंडळींशी त्यांचा पत्रव्यवहार होता. ते संस्कृतमधूनही पत्र लिहित. माझ्या संग्रही त्यांची संस्कृत पत्रे आहेत. शिरुभाऊंइतकी मोठ्या प्रमाणावर पत्रव्यवहार करणारी व्यक्ती माझ्या पाहण्यात नाही. त्यांचे मित्र श्री. वा. य. गाडगीळ त्यांना 'पत्रपंडित' म्हणत. सुमारे ४० वर्षांच्या त्यांच्या प्रचंड पत्रसंग्रहातून निवडक पत्रे संपादित करून छापली तर एक उत्तम 'विश्रब्धशारदा' होईल!

शिरुभाऊ 'जगमित्र' होते. त्यांचे अनेक ग्रुप्स होते. सकाळचा फिरण्याचा ग्रूप, मिरज-सांगलीकडील मित्रांचा ग्रुप, बँकेतील जुन्या मित्रांचा ग्रुप, चालू शाखेतील मंडळींचा ग्रूप, साहित्यप्रेमींचा ग्रूप त्याचप्रमाणे मराठी साहित्य परिषद, भारत इतिहास संशोधन मंडळ, वेदशास्त्रोत्तेजक सभा इथल्या मित्रांचे ग्रुप अशा सर्व ठिकाणी त्यांची अखंड भ्रमंती चालू असे.

बँकेत आणि बँकेबाहेरही त्यांनी इतकी माणसं जोडली होती की त्याची मोजदाद करणेही अवघड आहे. बँकेबाहेरील अनेक थोर व्यक्तिंशी त्यांचा परिचय होता. डॉ. रा. चिं. ढेरे, जयंत नारळीकर, कुलगुरू धनागरे, राम शेवाळकर, छायाचित्रकार वा. ना. भट, न्या. नरेन्द्र चपळगावकर, इतिहाससंशोधक य. न. केळकर, चित्रकार जि. भि. दीक्षित, डॉ. नवलगुंदकर, नाना (गोपीनाथ) तळवलकर, शरद तळवलकर, श्री. म. जोशी, नटवर्य चित्तरंजनबापू कोल्हटकर, वा. य. गाडगीळ, सांगलीचे वसंतराव आगाशे, प्रा. मिलिंद जोशी अशी किती नावे घ्यावीत? या साऱ्यांशी त्यांचा गाढ स्नेह होता. कुलगुरू धनागरे पाकिस्तानला जाणार होते त्यावेळी मी शिरुभाऊंना सुचवलं की त्यांना तिथून बॅ. जिनांचं एखादं चरित्र आणायला सांगा. त्याप्रमाणे धनागऱ्यांनी ते आणलंही होतं. पुभा भावे कुटुंबियांशी त्यांची इतकी जवळीक होती की ते भावे समितीच्या विश्वस्तांपैकी एक असून भावे पुरस्कार सोहळ्या'त हिरिरीने भाग घेत.

गुरुदेव रानडे यांचे नि:सीम भक्त असणारे व सांगलीच्या केळकर महाराजांचं साहचर्य लाभलेले शिरुभाऊ श्रद्धावान तर होतेच पण त्यांची कुटुंबवत्सलता व स्नेहवृत्ती कुणाच्या घरी गेले की दिसून येई. तिथल्या लहानग्यांची दखल तर ते घेतच पण वृद्धमंडळींना ते आवर्जून भेटत. त्यांच्याशी त्यांच्या गतकाळाविषयी गप्पा मारून त्यांचा 'नॉस्टाल्जिया' कुरवाळत. शिरुभाऊंबरोबर मी सुमारे पाच-सहा शतायुषी वृद्धांना भेटलो होतो.

लिहिण्या-वाचण्यासारखीच त्यांना बोलायचीही प्रचंड हौस होती. लिहिण्याप्रमाणेच त्यांचं बोलणंही अस्खलित होतं. मिश्किल

स्वभावामुळे त्यांच्या बोलण्यात नर्म व खुसखुशीत विनोदाची पेरणी असे. शब्दनिष्ठ विनोदावर त्यांची हुकमत होती. त्यांची वाणी अलंकृत नव्हती पण आकर्षक होती. गप्पांच्या ओघात काही वेळा चर्चा होई, वाद होत. आपल्या मतांबद्दल ते आग्रही असत. क्वचित वाद विकोपाला जात, अशावेळी ते आक्रमक होत, चिडत. काही दिवस मग अबोला धरत पण लवकर विसरत. अर्थात त्यामुळे आमच्या मैत्रीचे बुलंद बुरुज कधीच ढासळून पडले नाहीत.

आम्ही दोघे अनेक ठिकाणी जात असू, अनेकांना भेटत असू. भारदस्त शिरुभाऊ वयापेक्षा मोठे दिसत त्यामुळे समोरचा माणूस तशा अर्थाने काही बोलला की ते नाराज होत. ती त्यांची बोच होती. अशावेळी मी गमतीने त्यांना - 'शिरुभाऊ, तुमचं पांडित्य, तुमच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहतंय म्हणून असं होतं.'

'ते डोक्यात राहिलं तरी पुष्कळ!' असा स्वत:वरच विनोद करून ते खूष होत.

एव्हढे बहुश्रुत शिरुभाऊ पण चित्रपटातील नट नट्यांच्या बाबतीत त्यांचं ज्ञान तोकडं होतं. एकदा टी.व्ही.वर 'बुगडी माझी सांडली' हे गाणं चालू असताना त्यांनी मला विचारलं ही कोण नटी आहे? त्यावर वहिनी म्हणाल्या, 'बघाऽ, हे यांचं ज्ञान!' यावर आम्ही सगळे हसलो. त्यांचं चित्रपटविषयी अज्ञान हा आमचा चेष्टेचा विषय असे.

गेल्या पंचवीस वर्षात आमच्या अनेक विषयांवर गप्पा होत. पण 'बँक' या विषयावर एकही शब्द आम्ही बोलत नसू. याचं मुख्य कारण बँकेतील कामाव्यतिरिक्त बँकविषयक इतर गोष्टींमध्ये आम्हा दोघांनाही अजिबात रस नसे.

खरं म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक पैलूवर स्वतंत्र लेख लिहावा इतक्या योग्यतेचा हा माणूस होता!

शिरुभाऊंच्या ऐसपैस व मनमोकळ्या स्वभावामुळे घरी मित्रमंडळींचा कायम राबता असे. अनेकदा परगावचे मित्र मुक्कामाला असत. या सर्व आल्यागेल्याचं अगत्य व पाहुणचार सुजातावहिनी मनापासून सांभाळत. शिरुभाऊंच्या आजारात अगदी पहिल्यापासून शेवटपर्यंत त्यांनी खूप केलं. हा उल्लेख केला नाही तर मी त्यांचा अपराधी ठरेन.

शालेय जीवनात विद्याभ्यासाबरोबर ते बलोपासनाही करत. मलखांबामुळे गोटीबंद शरीर प्राप्त केलेले शिरुभाऊ पोहण्यातही तितकेच तयार होते. पावसाळ्यात सांगलीच्या जुन्या आयर्विन पुलावरुन कृष्णेच्या पुरात झोकून देऊन पैलतीर गाठत. अशा बलदंड व निर्व्यसनी शिरुभाऊंना कर्करोगासारख्या दुर्धर आजाराने पोखरून काढावं याला काय म्हणावं? या आजाराने त्यांच्यावर अनेक बंधने पडली.

पायाला भिंगरी असल्याप्रमाणे सदैव फिरत राहणारे शिरुभाऊ घरात एका बेडवर जखडून पडले. उदंड बोलणाऱ्या या माणसाचा आवाज क्षीण व्हावा त्यांना बोलता येऊ नये, स्वत: खवैय्या असून इतरांनाही नेहमी चवीनं खाऊ घालणाऱ्या या माणसाला स्वत: काहीच खाता येऊ नये, वाचनलेखनाचा कायम ध्यास असणाऱ्या या माणसाला ते करता येऊ नये, हे सारे भोग नियतीने त्यांच्या नशिबी का लिहावे? सगळ्यात कहर म्हणजे निवृत्ती वेतन खात्यासाठी दरवर्षी लागणारं शिरुभाऊंचं 'लाईफ सर्टिफिकेट' ज्या दिवशी सकाळी घेतलं त्याच दिवशी रात्री त्यांचं 'डेथ सर्टिफिकेट' घ्यायची वेळ यावी. नियतीने अशी क्रूरचेष्टा का करावी? हे सारं तर्काच्या पलिकडचं आहे!

शिरुभाऊ काळाच्या पडद्याआड निघून गेले. पण माझ्याप्रमाणेच अनेकांच्या अंतकरणात असलेली त्यांची प्रतिमा कधीच पुसली जाणार नाही! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना!

**- मधु पोतदार**

दूरध्वनी : ०२०-२५४२०४५६

## अभिनंदनीय

आपले मुंबई येथील एक सभासद श्री. मुकुंद र. सोमण यांची नात कु. शर्वरी सोमण (मुलाची मुलगी) ही मुंबई विद्यापीठाची कॉम्प्युटर इंजिनिअरींग २०१२ च्या पदवी परीक्षेत ७५.८०% मार्क मिळवून विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाली. या सुयशाबद्दल कु. शर्वरीचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

## विनोद

शिक्षक - तुझे बाबा काय करतात?

विद्यार्थी - शिव्या व तक्रारी ऐकत असतात.

शिक्षक - काय म्हणतोस तू.

विद्यार्थी - माझे बाबा बँकेत मॅनेजर आहेत. त्यांना दिवसभर ग्राहकांच्या तक्रारी व घरी उशीर झाल्याबद्दल शिव्या ऐकावयास लागतात.

**- अशोक बुटाला, मुंबई**
**मोबा. - ९८३३१४८९०४**

# आचार्य अत्रे - भेट

## (पहिली आणि शेवटचीच)

आचार्य अत्रे हे माझे गेल्या ६० वर्षाचे दैवत. आपल्या दैवताला आयुष्यात एकदा तरी समक्ष भेटायचेच ही माझी तीव्र इच्छा होती.

मार्च १९६९ मध्ये हनुमान जयंतीच्या संस्मरणीय दिवशी मात्र अत्रे भेटीचा योग माझ्या जीवनात आला आणि हा दिवस अतिशय समाधानाचा ठरला. कारण वरळीच्या 'शिवशक्ती' वास्तुत मी माझे दैवत आ. प्र. के. अत्रे ह्यांना समक्ष भेटलो. थोडेसे भीत भीत त्यांच्याशी तासभर गप्पा गोष्टी करून घरी परतलो.

माझ्या अत्रे भेटीचा हा वृत्तांत मराठी वाचकांपुढे आणि अत्रे प्रेमी रसिकांपुढे सादर करण्याचा मोह मला आवरत नाहीये म्हणून हा प्रपंच!

माझ्यासाठी परचुरे प्रकाशन मंदिराचे कै. ग. पा. परचुरे ह्यांनी अत्र्यांना तात्काळ खालीलप्रमाणे एक चिठ्ठी लिहीली -

''श्री सुहास बोकील साताऱ्याहून आले आहेत. आपले सर्व साहित्य त्यांच्या संग्रही आहे. केवळ आपले दर्शन व्हावे एवढ्याच तळमळीने ते आपणांकडे येत आहेत. त्यांचे दुसरे काहीही काम नाही. तरी त्यांना भेट द्यावी.''

ह्या 'शुभ' कार्याला आता वेळ कशाला घालवा म्हणून दुसऱ्या दिवशीच सकाळी मी दारुखाना माझगांव ते वरळी नाका पेट्रोलपंप बेस्ट प्रवास करून 'शिवशक्ती' गाठली.

इमारतीवर 'मराठा' अत्रे पेपर्स प्रा. लिमीटेड पाटील पाहिली. शिवशक्तीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ४-५ पोलीस व दोन पोलीस इन्स्पेक्टर्स होते. गणवेशधारी एक गुरखाही होता. त्याला मी 'मला अत्रे साहेबांना भेटायचे आहे' असे सांगितले. त्याने परवानगी देऊन दुसऱ्या मजल्यावर जाण्यास सांगितले. प्रथम तेथे मला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिसला. शिवशक्तीत लिफ्ट असून मी जिन्याचाच वापर केला. समोरच ''आ.अत्रे निवासस्थान. भेटण्याची वेळ सकाळी १०.०० ते १२.०० व दुपारी ४.०० ते ६.०० ही पाटी होती. दारावरची बेल वाजवली व मनात आता कोण दार उघडणार हा विचार चालूअसतानाच कर्रऽर्रऽर्रऽ आवाज करीत दरवाजा मागे गेला. दार उघडणाऱ्या व्यक्तीला मी नाव, गाव सांगून ग. पां. परचुरेंनी दिलेली चिठ्ठी दिली. थोड्याच वेळात त्या व्यक्तीने तुम्हाला आत बोलावले आहे, म्हणून सांगितले. त्यानंतर मी निश्चय करून खंबीर मनाने आत गेलो. समोरच एक 'प्रचंड' व्यक्ती बसलेली पाहिली. हेच ते आचार्य अत्रे, हे मी ओळखल्यावर मी अदबीने त्यांना नमस्कार केला. क्षणभर आपण सिंहाच्या गुहेत पोहोचलो असेच वाटले.

कुठले बोकील तुम्ही! वाठारचे कां?

आ. अत्र्यांचा हा पहिलाच प्रश्न, कानाचे पडदे फाडून हृदयाला जाऊन तात्काळ भिडला. प्रश्न विचारून अत्र्यांनी हात करून मला 'बसा' म्हणून सांगितले. नमस्काराचा सोपस्कार झाल्यावर मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी धैर्य गोळा करून म्हणालो.

''आम्ही कोरेगांवचे बोकील, पण सध्या आम्ही सातारलाच असतो.''

मी : ही तुमची अभ्यासिका का?

आ. अत्रे : 'हो'

हे 'हो' ऐकताना माझी नजर मात्र साहेबांच्या शरीरयष्टीवर, पेहरावावर खिळली होती. नुकतेच त्यांचे कॉफीपान झाले होते. तेवढ्यात साहेबांनी ''पाटील आणखी एक कॉफी घेऊन या'' असे नोकराला फर्माविले. लगेचच नोकराने ट्रे मधून कॉफी आणि हनुमान जयंतीच्या प्रसादाचे खोबरे आणून पुढ्यात ठेवले.

आ. अत्रे : 'घ्या'

मी : आपण घ्या ना!

आ.अत्रे : अहो, मी आताच पाहुण्यांबरोबर कॉफी घेतली आहे. हनुमान जयंती आहे म्हणून प्रसाद आणला आहे.

मी : पण प्रसाद घ्या की.

आ.अत्रे : नको मला चावत नाही.

थोड्याच वेळात 'बरायं अत्रे साहेब चलतो आता.' असे म्हणत आधी आलेले गृहस्थ उठले. मला मनातून खूप बरे वाटले. कारण त्यानंतर अत्रेसाहेब व मीच अभ्यासिकेत बोलणार होतो. मी त्यांच्याजवळ जाऊन बसलो आणि बोलायला सुरुवात केली. माझे संपूर्ण नाव, गाव, सध्याचा पत्ता, वडिलांचे साहित्यप्रेम, अत्रेभक्ती, 'मराठा'चे वाचन इ. बाबत मी अत्र्यांना सांगितले व पुढे म्हणालो,

''मी 'मराठा'चे व अग्रलेखाचे वाचन, 'सती उषा' भार्गव ह्या पहिल्या वाचलेल्या अग्रलेखाबद्दल अत्र्यांविषयी वाटणाऱ्या प्रेम, आदर, भक्तीविषयी सांगितले.

मी : कां कोण जाणे पण मला कोणी काहीही म्हटले तरी 'इतके' वाटत नाही, पण तुम्हाला कोणी काही म्हटले, टीका केली की मला खूप वाईट वाटते.''

ह्यावर हसत हसत अत्रे म्हणाले - अहो, आम्हाला आता त्याची सवय झाली आहे.

मी : आता आपली प्रकृती कशी काय आहे? मध्यंतरी आपण पडल्याचे वाचले होते. तेव्हा पासून काळजी वाटते.

आ.अत्रे : तशी प्रकृती ठीक आहे. माझं मलाच कळत नाही काय होतं ते.

माझा व्यायाम थांबला. रोज समुद्राच्या काठाने मी तीन मैल फिरायला जातो, पण हल्ली जात नाही. मध्यंतरी उरळी कांचनला प्रकृती सुधारण्यासाठी गेलो होतो.

मी : मग त्याचा काही परिणाम झाला का?

आ.अत्रे : हो. थोडा फार झाला.

मी (विषय बदलत) : अग्रलेख रोज आपणच लिहिता का?

आ.अत्रे : आठवड्यातून चार पाच वेळा मी लिहितो. बाहेरगावी गेल्यावर दुसरे लोक लिहितात.

मी :अलीकडेच तुम्हाला सज्जनगडाच्या तात्यासाहेब स्वामींचे पत्र आले होते. ते आमच्या चांगल्या परिचयाचे असून आमच्या घराजवळच राहतात.

आ.अत्रे : समर्थांविषयी आणखीही लिहिणार आहे मी.

मी : आपण साहित्य संमेलनाच्यावेळी सातारा येथील कँपमध्ये उतरला होतात असे आठवते.

आ.अत्रे : हो. अहो गावात मोकळे हॉटेल नाही, म्हणून कँपमधील पारशी-सातारवाल्याच्या गेस्ट हाऊसवर उतरलो होतो. ते हवेशीर आहे.

''आम्हाला ट्रेनिंग कॉलेजात एक प्रा. बोकील शिकवायला होते.'' तसेच आपले आईकडून बोकीलांशी नाते असल्याचेही अत्रे साहेबांनी मला सांगितले.

मी : साहेब, आता 'कऱ्हेचे पाणी' पुन्हा केव्हा लिहिणार!

आ. अत्रे : अहो आता किती लिहावयाचे? २५०० पाने लिहीली. एवढे मोठे आत्मचरित्र कोणाचे नाही.

मी : आपले दै. मराठाचे कार्यालय, प्रेस, सुभाष सभागृह वगैरे सर्व येथेच आहे ना!

आ.अत्रे : हो. तुम्हाला बघायचे, आहे कां!

मी 'हो' म्हणताच अत्रे साहेबांनी 'पाटील' ह्यांना ताबडतोब हाक मारून मला सर्व 'शिवशक्ती' दाखविण्याची आज्ञा केली. श्री. पाटील ह्यांच्याबरोबर मी 'दै. मराठा प्रेस' व कार्यालय, संपादकीय विभाग इतर विविध विभाग, रशियाहून आणलेले प्रचंड रोटरी मशीन, संपादक आ. अत्र्यांची कार्यालयातील खोली त्यामध्ये असलेला 'कारुण्याचा विनोदी शाहीर' कै. दत्तू बांदेकर ह्यांचे भव्य तैलचित्र, भिंतीवरील अत्रे साहेबांचा रुबाबदार फोटो तसेच शेजारी असलेला क्रांतीसिंह नाना पाटीलांचा फोटो, उंची फर्निचर, इमारतीच्या मागील बाजूस असलेली अत्र्यांची लांबलचक लाख मोलाची आलिशान इंपाला गाडी हे सर्व काही बघून कोचावर बसलो.

आचार्य अत्रे ह्यांच्या अभ्यासिकेच्या भिंती पुस्तकांच्या कपाटांमागेच लपल्या होत्या. खचाखच पुस्तकांची भरलेली अनेक कपाटे दिसत होती. अनेक विषयांवरील विविध भाषेतील पुस्तके, ग्रंथ त्यामध्ये असावेत. मध्यभागी लिखाणाचे प्रशस्त टेबल होते. त्यावरही अनेक कागदपत्रे, वृत्तपत्रे, पुस्तके विखुरलेली दिसत होती. साहेबांची बैठकीची खुर्ची, टेबलावरील मोठा टेबल लॅम्प, शेजारीच आ. अत्रे व सौ. सुधाताई अत्रे ह्यांची रंगीत तसवीर, तसेच मातोश्री अन्नपूर्णाबाई अत्रे व छ. शिवाजी महाराज ह्यांच्या तसविरी होत्या. आजूबाजूच्या दोन-तीन खिडक्यांवर भगव्या रंगाचे पडदे सोडले होते.

मी हे सर्व एकाग्रचित्तेने पाहत असतानाच पलीकडील दालनांतून हनुमान जयंतीचा शेंदूर भाळी लावून आ. अत्रे अभ्यासिकेत आले. आता आमच्या भेटीचा उत्तरार्ध सुरू झाला होता.

मी : आपली 'शिवशक्ती' दै. 'मराठा' प्रेस कार्यालय, सुभाष सभागृह हे मी आत्ताच पाहून आलोय. मला सर्व काही आवडले - छानच आहे.

आ.अत्रे : पाहिलेत ना सर्व!

मी : आपण सातारला केव्हा येणार?

आ.अत्रे : तुम्हीच मुंबईला आलात की येत जा.

मी : पण आता कुणाची ओळख, पत्र लागणार नाही ना?

आ.अत्रे : नको, नको. आता, एकदा ओळख झाली आहे. सातारला परवाच आलो होतो, पण स्टँडवरून लगेच पाचगणीला गेलो. आमची नातवंडे तेथे शिकायला आहेत. असे म्हणत अत्रे साहेब खुर्चीवर बसून पुन्हा 'राजकारण आणि विनोद' हे सदर लिहू लागले.

मी : बराय, आता मी निघतो. येथे फोटोग्राफर मिळणार नाही का! मला तुमच्याबरोबर फोटो काढण्याची खूप इच्छा आहे. त्याचा खर्च मी देईन.

आ.अत्रे : पुढच्या खेपेला फोटो काढू. फोटोग्राफरला आधी सांगून ठेवावे लागते.

मी : मला काही संदेश वगैरे द्या.

आ.अत्रे : तुम्ही मला पत्र लिहा. मी पत्रोत्तर पाठवीन. मात्र पत्रावर 'वैयक्तिक' असे लिहा. कारण माझे स्वत:चे सर्व टपाल मीच उघडतो. मग उत्तर देईन.

मी : मी येतो आता, असे म्हणत अत्रे साहेबांना मी खाली वाकून नमस्कार केला आणि पुन्हा एकदा त्यांना 'जातो' असे सांगून त्यांच्या प्रशस्त अभ्यासिकेतून व्हरांड्यात आलो आणि 'शिवशक्तिचा' निरोप घेतला. माझे मन मात्र 'कृतार्थ झाले अवघे जीवन' असेच म्हणत होते.

पण माझ्या आयुष्यात सदैव एकच खंत राहिली, ती म्हणजे आ. अत्रे ह्यांच्या समवेत फोटो मात्र कधीच काढता आला नाही. कारण त्यांनी सुचविलेली 'पुढची खेप' पुन्हा कधीच झाली नाही. त्यानंतर लगेचच १३ जून १९६९ रोजी महाराष्ट्राच्या ह्या महापुरुषाने बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्वाने, बलदंड अष्टपैलू साहित्यिक अन् पत्रकाराने त्याच्या परमप्रिय महाराष्ट्राचा निरोप घेतला. त्यामुळे माझी ही अत्रे भेट पहिली आणि शेवटचीच ठरली.

- **सुहास बोकील**, पुणे

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month

# नूतन वर्ष स्वागत

सदोदीत नवं नवं, काहीतरी हवं
येणार साल नवं, '२०१३' हवं
संपत आलं साल २०१२, तरी तेही मला हवं

सरतं साल सुखाचं, सवयीनं झालं होतं
सुख नव्या सालामध्ये, शोधायला हवं

मनासारख्या गोष्टी साऱ्या, घडायला हव्यात
घडणाऱ्या गोष्टीसुद्धा, मनासारख्या व्हाव्यात

या हो या 'सुखोजी' तुम्हीही या 'आनंदराव'
'समाधानी' पोरं तुमची त्यांनाही घेऊन या
झिंग येईस्तोवर सारे गाऊ नाचू आनंदाने
२०१२ ला करू बाय सारे!

**– नी. व. ओढेकर** (नासिक)
भ्रमणध्वनी – ८९७५८२२८००

# प्रतिक्रिया

'संवाद' ऑक्टो. १२ दिवाळी विशेषांक १ नोव्हेंबर रोजी मिळाला. अंकाचे मुखपृष्ठ पणत्यांच्या मंद प्रकाशाने मांगल्यमय व प्रकाशमय झाले आहे. संपादकीयात म्हटल्याप्रमाणे सदर अंकात विविधांगी साहित्याच्या समावेश आहे. तसेच सर्व सभासद अंकाचे स्वागत करतील अशी आशा आहे. सर्वच अंकांची छपाई स्वच्छ व सुबक असते. 'संवाद' लेख स्पर्धेतील सहाही लेख दर्जेदार आहेत. परिक्षकांचा निर्णय उत्तम आहे. एकंदरीत अंकाने आपला दर्जा व तोल सांभाळला आहे.

**– अरुण भट, बदलापूर** (पू) भ्रमणध्वनी – ९६०४३८३६०७

आपला 'संवाद' अंक नेहमीच एवढा चांगला व वाचनीय असतो की त्याचे वर्णन करणे शक्य नाही. तो एक वेगळाच अनुभव घ्यावा. त्यातील माहिती, लेख व कविता मनाला एवढ्या भावणाऱ्या असतात की त्या पुन्हा पुन्हा वाचल्या जातात व प्रत्येक अंक बराच काळ जपला जातो. ह्या वेळच्या नोव्हेंबर २०१२ च्या अंकातील शेवटच्या दोन पानांवरील कविता मनास स्पर्शून गेल्या. अशा अंकाच्या हातभार लागलेल्या सर्वांना लाख लाख सलाम.

**– सौ. आरती न. जोशी, अंधेरी**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.